# कुलगुरू निवडप्रक्रिया बदलण्यासाठी 'टास्क फोर्स'

## विधेयक संसदीय अधिवेशनात मांडणार

**पुणे, दि. २६ (प्रतिनिधी) :** कुलगुरू निवडप्रक्रियेतील दोष दूर करून त्यात निःपक्षपातीपणा आणून केंद्रीय स्तरावरून त्यात एकसूत्रता आणण्यासाठी टास्क फोर्स स्थापन करण्यात आला आहे. या टास्क फोर्सच्या वतीने संपूर्ण आढावा घेऊन एक ड्राफ्ट तयार केला जात असून, त्यासंदर्भातील अहवाल केंद्रीय मनुष्यबळ विभागाला सादर केला जाणार आहे. संसदेच्या पुढील अधिवेशनात हे विधेयक मांडून त्याला कायद्याचे स्वरूप मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत.

केंद्रीय नियोजन आयोगाच्या प्रमुख ५ सदस्यांचा टास्क फोर्स सध्या याच मोहिमेवर असून, त्यासंदर्भात आढावा घेण्यासाठी देशभरात दौऱ्यावर आहे. विविध शहरांतील प्रतिसादाचा अंदाज घेऊन ही टीम आज पुण्यात दाखल झाली. या टास्क फोर्समध्ये ५ जणांचा समावेश असून, केंद्रीय नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव त्यातील एक सदस्य आहेत. त्यांनी आज या विषयी सविस्तर माहिती दिली.

डॉ. जाधव म्हणाले, की अखिल भारतीय तंत्रशिक्षण संस्था, विद्यापीठ अनुदान आयोग आणि एनसीटी अशा संस्थांचे विलीनीकरण करून राष्ट्रीय पातळीवर 'नॅशनल कमिशन फॉर हायर एज्युकेशन अँड रिसर्च' हा स्वतंत्र आयोग स्थापन करण्याचा प्रस्ताव आहे. त्याचाही आढावा ही टास्क फोर्स या कालावधीत घेणार आहे.

कुलगुरू निवडही राष्ट्रीय पातळीवर निःपक्षपातीपणे व्हावी, असा केंद्रीय नियोजन आयोगाचा प्रयत्न राहणार आहे. त्यासाठी हा आढावा घेण्यासाठी बंगळूर, चेन्नई, भोपाळ आदी प्रमुख शहरांतून आता पुण्यात आलो आहोत. या संदर्भात विविध शिक्षणतज्ज्ञ, सामाजिक संस्था, कार्यकर्ते यांचीही मते या संदर्भात मागविण्यात येत असून, केंद्रीय मनुष्यबळ आयोगाच्या संकेतस्थळावरही चांगल्या प्रतिक्रिया प्राप्त होत आहेत. लवकरच याचा एकत्रित अहवाल केंद्रीय मनुष्यबळ विभागाकडे सुपूर्त केला जाणार आहे.

# उच्च शिक्षणाचे काम आता एनसीएचएआर पाहाणार

**पुणे** : सध्या शैक्षणिक क्षेत्राशी संबंधित असणाऱ्या यूजीसी, एआयसीटी व एनसीटीई या संस्था रद्द करून उच्चशिक्षणाचे कामकाज पाहणारी नॅशनल कमिशन फार हायर एज्युकेशन अॅन्ड रिसर्च (एनसीएचएआर) ही एकच संस्था स्थापन करण्याचा प्रयत्न केंद्र शासनातर्फे केला जात असून त्याबाबतचे काम जोमाने सुरू आहे. नियोजन मंडळाचे सदस्य व पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. नरेंद्र जाधव यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. जाधव म्हणाले की, एनसीएच-एआयचे काम लवकर सुरू करण्यासाठी पंतप्रधानांच्या आदेशानुसार कृतीदल तयार करण्यात आले आहे. या कृती-दलातील सदस्य सर्व विद्यापीठा-तील पदाधिकाऱ्यांशी चर्चा करीत आहेत. तसेच याबाबत अभ्यास-कांच्या व नागरिकांच्या प्रतिक्रिया मागविण्यात आल्या आहेत. सर्व अभ्यास केल्यानंतर केंद्रीय मनु-ष्यबळ विकास मंत्रालयाला या बाबतचा मसुदा सादर केला जाणार आहे. स्थापन करण्यात आलेल्या टास्क फोर्सच्या प्रमुखपदी डॉ. नरेंद्र जाधव यांची नियुक्ती करण्यात आली असून यात इतर पाच सदस्य आहेत.

केसरी
3/3/10

चिंतन इमेज मेकर्स

# पुणे विद्यापीठाचा नावलौकिक आणखी उंचावणार

**पुणे, दि. २६ (प्रतिनिधी) :** पुणे विद्यापीठाला राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय स्तरावर नेऊन पुणे विद्यापीठाचा नावलौकिक आणखीन उंचावण्यासाठी आपण मनापासून प्रयत्नशील राहू, असे प्रतिपादन पुणे विद्यापीठाचे नवनियुक्त कुलगुरू डॉ. रघुनाथ शेवगावकर यांनी 'लोकमत'शी बोलताना व्यक्त केले.

पुणे विद्यापीठाच्या कुलगुरूपदाची घोषणा आज सकाळी करण्यात आली. या पदासाठी दोनच दिवसांपूर्वी अंतिम ५ उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या होत्या. कुलगुरू निवडीच्या स्पर्धेत डॉ. पंडीत विद्यासागर, डॉ. डी. जी. कान्हेरे, डॉ. भूषण पटवर्धन, पी. गोपालन या उमेदवारांना मागे सारून आयआयटी मुंबईतील उपसंचालक असलेल्या डॉ. शेवगावकर यांच्याच गळ्यात पडली.

सकाळी कुलगुरूपदाची घोषणा होताच त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव झाला. व्यस्त दिनक्रमातून 'लोकमत' ला दिलेल्या मुलाखतीत ते म्हणाले, पुणे विद्यापीठाचे कुलगुरूपद मिळणे ही गौरवाची बाब आहे. त्यामुळे एक खूप मोठी जबाबदारी माझ्या खांद्यांवर येऊन पडलेली आहे. परंतु माझा शिक्षणाच्या क्षेत्रातील व चांगल्या कामाचा अनुभव गाठिशी असल्यामुळे पुणे विद्यापीठाचा कुलगुरू या नात्याने



## पुणे विद्यापीठाचे १८ वे कुलगुरू

विद्वान कुलगुरूंची परंपरा असलेल्या पुणे विद्यापीठातील कुलगुरूंच्या परंपरेत आता डॉ. रघुनाथ शेवगावकर यांचाही समावेश होणार आहे. हे पुणे विद्यापीठाचे १८ वे कुलगुरू ठरणार आहेत. वर्ष २००६ ते २००९ या काळात डॉ. नरेंद्र जाधव हे कुलगुरूपदाची धुरा सांभाळत होते. केंद्रीय नियोजन आयोगाच्या सदस्यपदी नियुक्ती झाल्यानंतर मध्यावधीतच हे पद रिक्त झाले. त्यानंतर काही महिने डॉ. अरुण अडसुळ हे प्रभारी कुलगुरू या नात्याने जबाबदारी पाहत होते. कुलगुरूंनी पदभार स्विकारल्यानंतर डॉ. अडसुळ पदाची सर्व सुत्रे कुलगुरूंकडे सुपूर्त करणार आहेत.

करू. पुणे विद्यापीठातील शिक्षणाचा दर्जा उच्च राखणे, पुणे विद्यापीठातील शिक्षण व संशोधनाला प्रोत्साहन देऊन

ठेवणे, विद्यापीठाच्या विस्तार विकासासाठी चांगले अर्थसहाय्य उपलब्ध करून देणे, राष्ट्रीय व

विद्यापीठाचे नाव अधोरेखित करणे आदी उद्दीष्टे मी माझ्या मनाशी ठेवलेली आहेत. पुणे विद्यापीठात मी याच दृष्टीकोनातून माझ्या कामाची उभारणी करणार आहे. या कामी सर्वांचे सहकार्य मला मिळेल याची मला खात्री आहे. सकाळी ११ वाजता राजभवनातून त्यांना पहिला फोन आला व पुणे विद्यापीठाच्या कुलगुरूपदी निवड झाली असल्याचे समजताच त्यांचा आनंद गगनात मावेनासा झाला. पुणे विद्यापीठातूनही अनेकांनी दूरध्वनी करून त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. पुढील आठवड्यात मी पुणे विद्यापीठामध्ये रुजू होऊन

## उच्च विद्याविभूषित व्यक्तिमत्त्व!

* ग्वाल्हेरच्या जिवाजी विद्यापीठातून इलेक्ट्रीकल इंजिनिअरिंग
* सुवर्णपदकाचे मानकरी
* आयआयटी कानपूरमधून एम. टेक
* आयआयटी मुंबईतून पीएच. डी. (१९८५)
* इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ अॅस्ट्रोफिजिक्स, रामन रिसर्च इन्स्टिट्यूट बेंगलोर येथे १९७८ आणि १९८२ मध्ये संशोधन
* संशोधनासाठी अमेरिकेतील युनिव्हर्सिटी ऑफ मॅरिलँड येथे काम
* १९८७ पासून आयआयटी

# साहित्य संमेलनात भरगच्च कार्यक्रमांची मेजवानी

▶ पुणे/ प्रतिनिधी

पुण्यात होणारे ८३ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आता केवळ सात दिवसावर येऊन ठेपले आहे. २५ ते २८ मार्च दरम्यान होणाऱ्या या संमेलनात ग्रंथदिंडी, १० परिसंवाद, दोन कविसंमेलने, मुलाखती आणि सांस्कृतिक कार्यक्रमाची रेलचेल असणार आहे. ना. धों. महानोरांच्या हस्ते उद्‌घाटन, पाडगावकरांशी संवाद, अमिताभची उपस्थिती ही संमेलनाची मुख्य आकर्षणे ठरणार आहेत.

डॉ. द. भि. कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या संमेलनाची सुरवात २५ मार्च रोजी ग्रंथदिंडीने होणार आहे. सायंकाळी पाच ते सात या वेळेत टिळक रोड वरून ही ग्रंथदिंडी जाणार आहे. सायंकाळी सात वाजता डॉ. प्रकाश आमटे यांच्या हस्ते ग्रंथ प्रदर्शनाचे उद्‌घाटन करण्यात येणार आहे. शुक्रवारी २६ मार्च रोजी सकाळी १० ते १ या वेळेत कवी ना. धों. महानोर यांच्या उपस्थितीत आणि डॉ. द. भि. कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली दैदिप्यमान उद्‌घाटन सोहळा पार पडेल. दुपारी अडीच ते तीन या वेळेत पहिला परिसंवाद '२१ वे शतक आणि संतसाहित्य ' या विषयावर आमदार उल्हास पवार यांच्या उपस्थितीत रंगेल. यात वक्ते म्हणून फेलिक्स मिर्चेंडो (वसई), डॉ. किशोर सानप (वर्धा), फादर फ्रान्सिस दिब्रेटो (वसई), डॉ. सदानंद मोरे (पुणे) हे सहभागी होणार आहेत. दुपारी अडीच ते पाच या वेळेत 'मराठी कविता आणि ग्रामीण वास्तव' हा परिसंवाद डॉ. सुषमा करोगल यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून यात डॉ. दिलीप धोंडगे (सटाणा), डॉ. रणजीत शिंदे (कोल्हापूर), डॉ. महेश खरात (गंगापूर), डॉ. सुहास पुजारी (सोलापूर) डॉ. ह्षिकेश कांबळे (औरंगाबाद) आदी सहभागी होणार आहेत. सायंकाळी साडेपाच वाजता प्रा. द. मा. मिरासदार यांच्या अध्यक्षतेखाली कथाकथन होत असून यात रेखा बैजल (जालना), प्रतिमा इंगोले (दर्यापूर), डॉ. रमा मराठे (बेळगाव), बाबा परीट (सांगली), माधवी घारपुरे (डोंबिवली) श्रीकांत तारे (इंदूर) सहभागी होणार आहेत. रात्री साडेआठ वाजता कविवर्य ना. धों. महानोर यांच्या अध्यक्षतेखाली 'निमंत्रितांचे' संमेलन रंगणार आहे.

शनिवारी २७ मार्च रोजी सकाळी नऊ वाजता श्याम मनोहर आणि मेघना पेठे यांची प्रकट मुलाखत घेण्यात येणार आहे. डॉ. चंद्रशेखर जहागीरदार, डॉ. अरूणा दुभाषी आणि रूपाली शिंदे या मुलाखती घेतील. याचवेळी दुसऱ्या मंडपात 'मनोरंजनाच्या नादात आजच्या बालसाहित्यातील मूल्यभान हरपत चालले आहे.' परिसंवाद डॉ. न. म. जोशी यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. यात रेणू गावसकर, (पुणे), रेणू दांडेकर (चिखलगाव), डॉ. सुरेश सावंत (नांदेड), डॉ. केशव तुपे (देवगाव), अमोल गुप्ते (मुंबई) सहभागी होणार आहेत. दुपारी अडीच वाजता न्यायमूर्ती नरेंद्र चपळगावकर यांच्या अध्यक्षतेखाली 'अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि सामाजिक दबाव' परिसंवाद होणार आहे. डॉ. रावसाहेब कसबे (संगमनेर), डॉ.

श्रीपाल सबनीस (धुळे), डॉ. पृथ्वीराज तौर (नांदेड), डॉ. जब्बार पटेल (मुंबई), संजय राऊत (मुंबई), अवधूत गुप्ते (मुंबई) सहभागी होतील. याचवेळी दुसऱ्या मंडपात 'साहित्य संस्था आणि कालानुरूप अपेक्षित बदल' या परिसंवादात कुलगुरू डॉ. नागकाथ कोत्तापल्ले यांच्या बरोबर डॉ. बाळ भालेराव (मुंबई), सुरेश द्वादशीवार (नागपूर), बबन नाखले (नागपूर), डॉ. रवींन्द्र घवी (पणजी), मुकुंद अनगळ (पुणे), मिलींद जोशी (पुणे), कांचन जतकर (हैद्राबाद) सहभागी होतील. सायंकाळी सहा वाजता कविवर्य मंगेश पाडगावर, केतकी करंदीकर, सक्षम कुलकर्णी तसेच इतर मुलांशी संवाद साधणार आहेत. याचवेळी दुसऱ्या मंडपात 'माध्यम तंत्रज्ञान आणि मराठी भाषा' परिसंवाद डॉ. सुधीर गव्हाणे यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून यात डॉ. सुधाकर डोईफोडे (नांदेड), डॉ. नितीन केळकर, राजीव खांडेकर, नितीन वैद्य , निळू दामले (सर्व मुंबई) सहभागी आहेत. रात्री आठ वाजता झी वाहिनीचा 'आनंदयात्रा' हा सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे.




रविवार २८ मार्च रोजी सकाळी ९ वाजता रामादास फुटाणे यांच्या अध्यक्षतेखाली कविसंमेलन होणार आहे. त्यानंतर ११ वाजता 'महाराष्ट्रात मराठी भाषेचा वापर करण्याची सक्ती करणे काळाची गरज आहे का' या विषयावरील परिसंवाद न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली होईल यात उपमुख्यमंत्री छगन भुजबळ, सहकारमंत्री हर्षवर्धन पाटील, खासदार मनोहर जोशी आणि आमदार विनोद तावडे सहभागी होतील. याचवेळी दुसऱ्या मंडपात 'कथा गौण वाङमय प्रकार आहे काय' यावरील परिसंवाद डॉ. गो. मा. पवार यांच्या अध्यक्षतेखाली होईल. यात रा. रं. बोराडे (औरंगाबाद), ह. मो. मराठे (पुणे), भारत सासणे(बीड), सदानंद देशमुख( बुलढाणा) सहभागी होतील. दुपारी अडीच वाजता कॅनडाच्या विद्युलता अकलूजकरयांच्या अध्यक्षतेखाली 'सातासमुद्रापलिकडील मराठी लेखन' विषयावरील परिसंवाद होणार आहे. यात विद्या हार्डिकर-सप्रे (अमेरिका), मुग्धा येवलेकर-अकलूजकर (अमेरिका), डॉ. उज्वला दळवी (सौदी अरेबिया), माधव भावे (सिंगापूर), डॉ. भूषण केळकर (अमेरिका) सहभागी होतील. त्यानंतर दुपारी साडेचार वाजता डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली 'मराठी साहित्यातील नवे भान नव्या वाटा' हा परिसंवाद होणार असून यात डॉ. राजन गवस (पुणे) डॉ. जगदीश कदम (नांदेड), राजेंद्र दास (सोलापूर), आसाराम लोमटे (परभणी), रविंद्र शोभणे, डॉ. रामनाथ चव्हाण सहभागी होतील. संमेलनाचा सांगता समारंभ सोहळा सुप्रसिद्ध अभिनेते अमिताभ बच्चन यांच्या आणि मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्या उपस्थितीत सायंकाळी साडेसहा ते आठ या वेळेत रंगणार आहे. यावेळी लेखिका ज्योत्स्ना देवधर, प्रकाशक सु. वा. जोशी तर संयुक्त महाराष्ट्र लढ्यातील शाहीर आत्माराम पाटील, शाहीर साबळे आणि शाहीर लिलाधर हेगडे यांचा सत्कार करण्यात येणार आहे.

दै. पुढारी दि. 16/3/10 पान नं. १ व २

उच्च शिक्षणाचा दर्जा सुधारण्याची आवश्यकता ; अन्यथा...

# भारत महासत्ता बनणे दिवास्वप्न ठरेल

## डॉ. नरेंद्र जाधव यांचे प्रतिपादन : विद्यापीठाचा थाटात दीक्षांत समारंभ




शिवाजी विद्यापीठाच्या ४६ व्या दीक्षांत समारंभात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल पौर्णिमा जाधव या विद्यार्थिनीचा राष्ट्रपती सुवर्णपद देऊन गौरव करताना डॉ. नरेंद्र जाधव. शेजारी कुलगुरू डॉ. एन. जे. पवार, बी. एम. हेर्डेकर, डी. टी. शिर्के.

प्रतिनिधी

**कोल्हापूर :** उच्च शिक्षणातील दर्जा जोपर्यंत सुधारत नाही, तोपर्यंत भारताचे महासत्ता बनण्याचे स्वप्न हे दिवास्वप्नच राहील, असे मत भारताचे नियोजन मंडळाचे सदस्य व पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या ४६ व्या दीक्षांत समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. समारंभाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. एन. जे. पवार होते. यावेळी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल भारताचे राष्ट्रपती सुवर्णपदकाने पौर्णिमा अजितानंद जाधव हिला गौरविण्यात आले.

या दीक्षांत समारंभामध्ये ४९ हजार स्नातकांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या पदवी-पदविका प्रदान करण्यात आल्या. यावेळी बोलताना नरेंद्र जाधव म्हणाले, भविष्यात भारत देशातील युवापिढीला विशेष महत्त्व प्राप्त होणार आहे. शिक्षण या क्षेत्राला पूर्वीपेक्षा प्रचंड महत्त्व प्राप्त होणार आहे. देश महासत्ता होण्यासाठी ज्ञानाचे हे भांडार युवा पिढीसाठी खुले होणार असून त्याचा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी लाभ घेणे गरजेचे आहे. परदेशी विद्यापीठांच्या तुलनेत आपल्या देशातील उच्च शिक्षणाची प्रगती कमी आहे.

परदेशामध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमाला विशेष प्राधान्य दिले जाते. ही बाब अजून आपण स्वीकारलेली नाही. आजही ९० टक्के पदवी प्राप्त केलेले (पान २)

# स्वत:मधील दडलेला राजहंस शोधा

पान १ वरून

परिसरातील खुल्या लोककला सभागृहात पार पडलेल्या या दिमाखदार सोहळ्यास आमदार भगवानराव साळुंखे, माजी कुलगुरू डॉ. रा.कृ. कणबरकर, माजी आमदार बाबूराव धारवाडे, ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डी.बी.पाटील यांच्यासह व्यवस्थापन परिषद, विद्याशाखा सदस्य उपस्थित होते.

राष्ट्रपती सुवर्णपदक व ७३२९ स्नातकांना प्रत्यक्ष पदव्या

डॉ. नरेंद्र जाधव, कुलगुरू डॉ.पवार यांच्या हस्ते यावेळी प्रातिनिधीक स्नातकांना पदव्या प्रदान करण्यात आल्या. राज्यशास्त्र विषयाची विद्यार्थीनी पौर्णिमा जाधव यांना यावेळी राष्ट्रपती सुवर्णपदक बहाल करण्यात आले. यंदा ४९७५१ पदव्या प्रदान करण्यात आल्या. त्यापैकी ७३२९ स्नातकांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून पदवी प्रमाणपत्रे स्वीकारली. तसेच विशेष गुणवत्ताधारक ४८ विद्यार्थ्यांना व्यासपीठावर पारितोषिके प्रदान करण्यात आली. तसेच १७४ पीएच.डी.धारकांना पदवी प्रदान करण्यात आली.

दुपारी तीन वाजता मुख्य सोहळ्यास प्रारंभ झाला. तत्पूर्वी प्रथेप्रमाणे विद्यापीठाचा मानदंड परीक्षा विभाग प्रमुख डॉ. बी. एम. हिर्डेकर यांनी समारंभ स्थळी आणला. कुलगुरू डॉ. पवार, कुलसचिव डॉ.डी.डी.शिर्के, वित्त व लेखा अधिकारी बी.एस.पाटील हे डॉ. जाधव यांना घेऊन समारंभस्थळी येताच हजारो विद्यार्थ्यांनी हात उंचावत, टाळ्यांचा गजर करत पाहुण्यांचे स्वागत केले.

स्नातकांना पदव्या बहाल करण्याचा कार्यक्रम आटोपताच डॉ.जाधव व्यासपीठावर बोलण्यासाठी उभे राहिले आणि सगळ्यांच्या नजरा त्यांच्यावर खिळल्या. जागतिकीकरण, वाढती स्पर्धा, व्यावसायिक शिक्षणाची आवश्यकता, बदलती शिक्षणपध्दती, विकसित देश व त्यांचा शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन आणि भारतातील शैक्षणिक स्थिती याची अतिशय सुरेख मांडणी करत जाधव सरांनी विद्यार्थ्यांची मने जिंकली.



कोल्हापूर : दीक्षांत समारंभात स्नातकांना उद्देशून बोलताना डॉ. नरेंद्र जाधव, सोबत कुलगुरू डॉ. एन. जे. पवार, परीक्षा नियत्रंक डॉ. बी. एम. हिर्डेकर, कुलसचिव डॉ. डी. टी. शिर्के

भारत जागतिक महासत्ता बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. सर्वार्थांनी देशाला बलवान बनवण्यात तरूणांचे योगदान खूप मोठे आहे, हा जागतिक इतिहास आहे. भारताच्या दृष्टीने जमेची बाजू म्हणजे हा देश तरूणांचा आहे. भारतातील युवकांचे सरासरी वय २४ आहे. अमेरिका, जपान, चायना, इंग्लड या देशातील युवकांचे वय आपल्या देशातील युवकांच्या पेक्षा अधिक आहे. भारताला आर्थिक महासत्ता व्हायचे असल्यास युवाशक्तीला शिक्षण व प्रशिक्षणाची आवश्यकता आहे. तरूणांची शक्ती हीच खरी राष्ट्रशक्ती आहे.'अशा शब्दांत विद्यार्थ्यांची मने चेतवत जाधव सरांनी विद्यार्थ्यांना वास्तवाचीही जाणीव करून दिली.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना जाधव पुढे म्हणाले, परिस्थिती प्रतिकूल असली तरी त्याला दोष देत बसू नका. परिस्थितीवर मात करणारी योग्य प्रकारची मानसिकता तयार करा. छोट्या-छोट्या गोष्टीविषयक मनातील जळमटं दूर करा. मनोदारिद्र्य हे दारिद्र्यापेक्षा भयानक आहे. गरीबीचं उदात्तीकरण करत बसला तर आयुष्यभर गरीबीतून बाहेर पडणार नाही. अंथरूण-पांघरून पाय पसरावे, गरीबी घटीकटी... श्रीमंती लुळीपांगळी... या म्हणी म्हणजे गरीबांमध्ये गरीबी अधिक खोलवर रूजवण्यासाठी श्रीमंतांनी पसरवलेली अफवा आहे. तुम्ही अंथरूण पाहून पाय आखडत राहिलात तर दुसरा तुमच्या अंथरूणात पाय पसरेल...अशा शब्दांत त्यांनी सल्ला दिला. सरतेशेवटी प्रतिकूल परिस्थितीच माणसाला घडवते. स्वत: स्वत:च्या पायावर उभं राहण्याचे शहाणपण उमजले पाहिजे अशा शब्दांत त्यांनी विद्यार्थ्यांतील जाणीवा जागृत केल्या.

कुलगुरू डॉ. एन.जे.पवार म्हणाले, विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून विद्यापीठाची वाटचाल सुरू आहे. तथापि बदलत्या परिस्थितीनुसार आपल्यात बदल आवश्यक आहे. आपल्या दृष्टीकोनात संपूर्ण बदल घडवून आणण्याची गरज आहे. नवी कौशल्ये, नवे ज्ञान व ती मिळवण्याची साधने प्राप्त करणे काळाची गरज आहे. सातत्याने अध्ययन, अध्यापन व संशोधन क्षेत्रातील प्रत्येक गोष्ट उत्तम प्रकारे करण्याचा ध्यास घेतला पाहिजे. सक्षम विद्यार्थी घडवण्यासाठी संगणक कौशल्य, इंग्रजी संभाषण कौशल्ये विकसित करण्यात येणार आहेत. येत्या पाच वर्षात शिवाजी विद्यापीठास जागतिकीकरण ाच्या नव्या आव्हानांना सामोरे जाण्यास सज्ज करण्याचा संकल्प केल्याचे कुलगुरूंनी सांगितले. प्रभारी कुलसचिव यांनी दीक्षांत समारंभाविषयी मनोगत व्यक्त केले. वंदे मातरमने समारंभाची सांगता झाली.

# युजीसी, एआयसीटी रद्द करणार

पान १ वरून

सदस्य आहोत. या फोर्सने देशातील १३ राज्यातील प्रतिक्रिया जाणून घेतल्या. त्याचा अहवाल केंद्र सरकारसमोर सादर केला जाईल. असेही डॉ. जाधव यांनी सांगितले.

शिवाजी विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ संपल्यानंतर पत्रकारांशी बोलताना डॉ. जाधव म्हणाले, आपल्या देशातील उच्च शिक्षणामध्ये मोठ्याप्रमाणावर वाढ झाली आली. पण हे शिक्षण परिणामकारक आहे का असा सवाल निर्माण झाला. आपल्या देशात पदवी शिक्षणात केवळ १२ टक्के युवकांचा समावेश आहे. उर्वरित ८८ टक्के युवकांना पदवी शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणले पाहिजे. यशपाल समितीने नॅशनल नॉलेज कमिशनुसार केंद्र सरकारने उच्च शिक्षणात बदल करण्याचा निर्णय घेतला आहे.

विद्यापीठ आणि महाविद्यालयांच्या विकासासाठी स्थापन केलेल्या नॅक मधून काय साधले असा सवाल करून ते म्हणाले, १९८४ साली नॅक स्थापन झाले. नॅक ने आतापर्यंत देशातील २० टक्के महाविद्यालयांची तपासणी केलेली नाही. त्यामुळे देशातील सर्व महाविद्यालयांची तपासणी करावयासाठी नॅक ला किमान पन्नास वर्षाचा कालावधी लागेल. तोपर्यंत पूर्वी ज्या महाविद्यालयांची तपासणी झालेली आहे. त्यांची दुसऱ्यांदा तपासणी करण्याची वेळ येईल. [illegible] रद्द करण्यात येणार आहे.

देशातील विद्यार्थ्यांना परदेशी विद्यापीठात शिक्षण घेता यावे, यासाठी दोन्ही विद्यापीठांमध्ये सामंज्यस्य करार केला जातो. त्यामध्ये परदेशातील कमी दर्जाच्या विद्यापीठाशी येथील विद्यापीठाचा करार होतो. पण त्यामधून तेथील विद्यापीठांना मोठ करण्याचे काम होते. विद्यापीठांना कुलगुरू निवडीचे अधिकार राज्य सरकारकडे आहेत. पण आता त्यामध्ये थोडा बदल करून विद्यापीठातील अधिकार मंडळाने कुलगुरूंसाठी पाच व्यक्तीची नावे सूचवण्याचे अधिकार देण्यात येणार आहेत. त्याचबरोबर विद्यापीठांना विद्यार्थ्यांच्या संख्येवर अनुदान देण्याची योजनाही सुरू करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी कुलगुरू डॉ. एन. जे.पवार, प्रभारी कुलसचिव डॉ. डी. टी.शिर्के, परीक्षा नियंत्रक डॉ. बी.एम. हिर्डेकर, वित्त विभागप्रमुख बी.एस. पाटील आदी उपस्थित होते.

दै. तरुण भारत
दि. 16/03/2010
पान नं. 1 व 10

# विद्यापीठ अनुदान आयोग बरखास्त होणार : केंद्रीय नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांची माहिती

(१६-०३-२०१० : १२:०९:२४)

कोल्हापूर, दि. १५ (प्रतिनिधी) : दर्जेदार शिक्षण, कौशल्य आणि रोजगारनिर्मिती करणाऱ्या शिक्षणासाठी येत्या दोन वर्षांत उच्च शिक्षण पद्धतीत आमूलाग्र बदल होणार आहेत. यात विद्यापीठ अनुदान आयोग (युजीसी) ही केंद्रीय संस्था बरखास्त करून त्याऐवजी 'नॅशनल कमिशन फॉर हायर एज्युकेशन रिसर्च'(एन.सी.एच.ए.आर.) ही शिखर संस्था निर्माण करण्यात येणार आहे, अशी माहिती केंद्रीय नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांनी आज येथे पत्रकार परिषदेत दिली.

शिवाजी विद्यापीठाच्या पदवीदान समारंभाला ते प्रमुख पाहुणे म्हणून आले असता त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

डॉ. जाधव म्हणाले, यापूर्वी कधीही झाले नाहीत असे बदल येत्या दोन वर्षात होणार आहेत. ज्यामध्ये विविध विद्याशाखांच्या संस्था बरखास्त करण्यात येणार असून त्या सर्व 'नॅशनल कौन्सिल हायर एज्युकेशन रिसर्च' या शिखर संस्थेच्या अधिपत्याखाली येणार आहेत. त्यामुळे सर्व विद्याशाखांमध्ये समन्वय निर्माण होईल. राष्ट्रीय ज्ञान आयोग व यशपाल समितीने सुचविलेल्या शिफारशीनुसार त्यावर पंतप्रधानांनी नेमलेल्या टास्क फोर्समध्ये विचारविनिमय होऊन केंद्रीय विधिमंडळापुढे यासंबंधी प्रस्ताव ठेवण्यात येणार आहे. विद्यार्थी संख्येनुसार विद्यापीठांना अनुदान देण्यात येणार आहे. या होणाऱ्या बदलांची माहिती मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यावर सर्वसामान्य नागरिकांना आपल्या प्रतिक्रिया नोंदवून या प्रक्रियेतील सहभाग वाढवता येणार आहे.

कुलगुरू निवडीच्या पद्धतीबाबत ते म्हणाले, शिक्षण हा समवर्ती सूचीतील विषय असल्याने राज्य व केंद्र यांच्या अखत्यारित हा विषय येतो. कुलगुरू निवडीच्या अधिकाराबाबतच्या शिफारशीला काही राज्यांनी आक्षेप घेतला आहे. संबंधित विद्यापीठातील पाच व्यक्तींची नावे राज्य शासनाने सुचवावी. त्यापैकी कुलगुरू होणार आहे. ज्यांची नावे 'नॅशनल रजिस्ट्री कौन्सिल'मधील यादीत समाविष्ट केली जाणार आहेत व ही प्रक्रिया सुरू होणार आहे. याशिवाय परदेशी विद्यापीठाच्या शिक्षण धोरणविषयक विधेयक मंजूर झाल्यावर चांगल्या परदेशी शिक्षण संस्था भारतात येणार आहेत. दहाव्या पंचवार्षिक योजनेत शिक्षणावर नऊ हजार कोटी खर्च केला. ११ व्या पंचवार्षिक योजनेत तब्बल ८४ हजार कोटी खर्च केला जाणार असला तरी तो कमीच असल्याचे त्यांनी सांगितले. शिक्षणातील हे बदल महत्त्वपूर्ण आहेत. जे या बदलांना स्वीकारणार नाहीत ते प्रवाहाच्या बाहेर पडतील. उच्चतम शिक्षण, कौशल्य व प्रशिक्षण या जोरावर देशातील युवा शक्तीला आर्थिक उच्चतम शक्ती बनविण्यासाठी उच्च शिक्षणातील हे बदल महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या पत्रकार परिषदेला कुलगुरू डॉ. एन. जे. पवार, प्रभारी कुलसचिव डॉ. डी. टी. शिर्के, वित्त अधिकारी बी. एस. पवार, परीक्षा नियंत्रक डॉ. बी. एम. हिर्डेकर, प्रा. आर.बी. पाटील, डॉ. निशा पवार आदी उपस्थित होते.

ही बातमी प्रिंट करा | ही बातमी मित्राला इ-मेल करा


Copyright : Lokmat Newspapers Ltd - 2007
Developed, Hosted and Maintained by
MasterMind Technologies, Mumbai

लोकमत